ठाणे, बुधवार दि. २२ एप्रिल २०२६ वर्ष : १४, अंक : ३५४, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख
**मणिपूरची दुखरी नस**
ईशान्य भारतातील मणिपूर हे राज्य गेल्या काही काळापासून अस्थिरतेच्या भोवऱ्यात अडकले आहे. जातीय तणाव, हिंसाचार, विस्थापन आणि भीतीचे सावट ......पान २ वर


ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper
PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**
कमाल ३४° से | किमान २३° से

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| १,५५,२९० | २,६५,००० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



मुलगा सतत ऑनलाईन असतो, त्याला राजकारणात आणले तर हायटेक राजकारण तरी करता येईल. अन्यथा तसा तो वाया गेलाच आहे.

शांततेच्या दिशेने अमेरिकेचे पाऊल! जे.डी. व्हान्स इस्लामाबादमध्ये

# आज अमेरिका-इराणमध्ये निर्णायक चर्चेची शक्यता

गेल्या सात आठवड्यांपासून सुरू असलेल्या भीषण संघर्षानंतर आता जगाचे लक्ष पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादकडे लागले आहे. अमेरिकेचे नवनिर्वाचित उपराष्ट्राध्यक्ष जे.डी. व्हान्स मंगळवारी सकाळी इस्लामाबादमध्ये दाखल होत असून, इराणसोबतच्या दुसऱ्या फेरीच्या शांतता चर्चेचे ते नेतृत्व करणार आहेत. या चर्चेत इराणचे शिष्टमंडळही सहभागी होणार असल्याचे संकेत मिळाल्याने युद्धाचा धोका टळण्याची आशा निर्माण झाली आहे.
चर्चेसाठी नाट्यमय घडामोडी- 'ऑक्सिओस'ने दिलेल्या वृत्तानुसार, या चर्चेसाठी इराणने सुरुवातीला आपली भूमिका स्पष्ट केली नव्हती.

## ...असे न झाल्यास हल्ला करण्यास सज्ज, शस्त्रसंधी वाढवणार नाही-डोनाल्ड ट्रम्प

ही चर्चा अशा वेळी होत आहे जेव्हा ८ एप्रिल रोजी लागू झालेली दोन आठवड्यांची युद्धबंदी संपण्याच्या मार्गावर आहे. ट्रम्प यांनी आधीच इशारा दिला आहे की, जर या चर्चेतून कोणताही ठोस तोडगा निघाला नाही, तर अमेरिका इराणच्या पायाभूत सुविधांवर, विशेषतः पूल आणि वीज प्रकल्पांवर मोठा बॉम्बहल्ला सुरू करेल. प्रगतीची चिन्हे पाहून ट्रम्प यांनी चर्चेची अंतिम मुदत मंगळवारवरून बुधवार संध्याकाळपर्यंत वाढवली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले आहे की, इराणसोबतची युद्धबंदी बुधवारी रात्री 8 वाजेपर्यंत (अमेरिकन वेळेनुसार)च राहील. त्यांनी असेही म्हटले की, जर त्यापूर्वी कोणताही करार झाला नाही, तर ती पुढे वाढवण्याची शक्यता खूप कमी आहे.



इराणमधील 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड्स' (IRGC) कडून वाटाघाटी करणाऱ्या टीमवर कडक भूमिका घेण्यासाठी दबाव होता. "जोपर्यंत अमेरिका इराणवरील निर्बंध उठवत नाही, तोपर्यंत कोणतीही चर्चा होणार नाही," अशी ठाम भूमिका तेहरानने घेतली होती. मात्र, सोमवारी उशिरा इराणच्या सर्वोच्च नेत्यांनी हिरवा कंदील दिल्यानंतर इराणचे शिष्टमंडळ **(पान 2 वर)**

## महिला आरक्षण विधेयकाआडून

# देश तोडण्याचा डाव

**मोदी सरकार आणू पाहत असलेले महिला आरक्षण विधेयक लोकसभेत नामंजूर झाले. या विधेयकावरून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला. 'महिला आरक्षण विधेयकाआडून देश तोडण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव होता आणि तो विरोधी पक्षांनी उधळवून लावला.', असा टोला उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांना लगावला. तसंच त्यांनी सर्व मलाच पाहिजे या हव्यासाची वखवख सुटल्याचा टोला पक्ष सोडून गेलेल्यांना लगावला. भारतीय कामगार सेनेच्या सर्वसाधारण सभेच्या कार्यक्रमात सर्वांशी संवाद साधताना त्यांनी हे विधान केले.**

उद्धव ठाकरे यांनी यावेळी सत्ताधारी विरोधकांच्या मागे ईडी-सीबीआय लावत असल्याचा आरोप केला.



यावेळी त्यांनी सांगितले की, 'सगळं बळकवायचे काम यांच्याकडून सुरू आहे. तुमच्यात जिंकण्याची हिंमत नाही त्यामुळे तुम्ही निवडणूक जिंकण्यासाठी ईडी, सीबीआयच्या फौजा घुसवत आहेत. तुमचे कतृत्व

### उद्धव ठाकरे यांच्याकडून सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल

कमी पडत आहे, तुम्ही केलेले काम कमी पडत आहे. तिकडे नाक्या नाक्यावर फौजा उतरवल्यानंतर कसलं महिला आरक्षण, महिला कशा बाहेर पडतील. कशा निवडणूका होणार. या देशात लोकशाही जिवंत राहिली की नाही हा विचार करावा लागतोय.'
तसंच, 'ईडी, सीबीय, इनकम टॅक्स, पोलिस सर्वांना बाजूला ठेवा आणि शिवसेनेशी सामना करायला या. जरा काही झालं तर पकडायचं, केसेस टाकायच्या. जुन्या केसेस काढायच्या आणि छळायचं. मागे सगळं लावायचं आणि म्हणायचं आम्ही जिंकलो. **(पान 2 वर)**


### बंगालमध्ये वाघीण एकटीच लढतेय

कुणासाठी तुम्ही करताय हे सगळं? राज्य पाहिजे, देश पाहिजे, कशासाठी पाहिजे? विरोधी पक्षाचे बुरखे पडणार असे आपले सीएम म्हणतात अरे आम्ही हिंदू आहोत मग आम्हाला बुरखे का घालताय? असा टोला ठाकरे यांनी लगावला. तिकडं पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी ही वाघीण एकटीच लढतेय. जिंकल्याच पाहिजे त्या. त्या एका महिलेला हरवण्यासाठी जवळपास दोन लाख सीआरपीएफचे जवान तिकडे तैनात करण्यात आले आहे. जेव्हा मणिपूर जळत होतं, तेव्हा 30 हजार जवान होते. पण पश्चिम बंगालमध्ये निवडणुका आहेत तेव्हा तिकडे दोन काय पाच लाखाच्या घरात जवान तैनात करण्यात आले आहेत. **(पान 2 वर)**

### अखेर पैलवान खाशाबा जाधव यांना मिळणार मरणोत्तर पद्मविभूषण

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचचे केंद्र सरकारला आदेश

भारताला स्वातंत्र्योत्तर काळातील पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे 'पॉकेट डायनॅमो' पैलवान खाशाबा दादासाहेब जाधव यांना मरणोत्तर 'पद्मविभूषण'



पुरस्कार देण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने केंद्र सरकारला महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. या पुरस्काराबाबत येत्या 4 मे पूर्वी सकारात्मक निर्णय घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले असून, यामुळे खाशाबा जाधवांना 74 वर्षांनी मरणोत्तर पद्मविभूषण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. **कोर्टाचा केंद्र सरकारला दणका** - खाशाबा जाधव यांना सर्वोच्च नागरी सन्मान मिळावा यासाठी **(पान 2 वर)**

## थोडक्यात घडामोडी



### शरद पवार ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल, बारामती दौरा रद्द

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती पुन्हा एकदा बिघडल्यामुळे त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची कन्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी याबाबत माहिती दिली आहे. रुग्णालयात दाखल असल्यामुळे शरद पवार काल बारामती दौऱ्यावर जाऊ शकणार नाहीत. शरद पवार दिल्लीहून दोन दिवसांपूर्वी आले आणि त्यानंतर त्यांना ब्रीच कँडी रुग्णालयात ॲडमिट करण्यात आले. प्रकृती बिघडल्यामुळे उपचारासाठी त्यांना ॲडमिट करण्यात आले. सोमवारी डिस्चार्ज **(पान 2 वर)**

#### प्रकृती स्थिर, खबरदारी म्हणून दाखल

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शरद पवार यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. मात्र, त्यांचे वय आणि अलीकडची प्रकृती पाहता खबरदारीचा उपाय म्हणून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टर त्यांच्या सर्व रिपोर्ट्सची वाट पाहत आहेत, त्यानंतर पुढील उपचार किंवा डिस्चार्जबाबत निर्णय घेतला जाईल.

# आता एनए झाले सोपे !

## इमारत परवानगी व्यवस्थापन प्रणालीचे महसूल मंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

मुंबई : राज्यात जमिनीच्या बिगरशेती वापरासाठी आवश्यक असलेली अकृषिक रुपांतरण प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते इमारत परवानगी व्यवस्थापन प्रणालीचे लोकार्पण करण्यात आले. या नव्या प्रणालीमुळे नागरिकांना अकृषिक रुपांतरण अधिमूल्य ऑनलाइन भरता येणार असून, त्याची नोंद थेट 7/12 उताऱ्यावर होणार आहे. मंत्रालयात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे जमीन व्यवहार आणि बांधकाम प्रक्रियेत मोठा बदल होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### ऑनलाइन प्रक्रियेला गती

महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील सुधारणांनंतर शासनाने अकृषिक वापराबाबत निर्णय घेतला होता. त्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी बीपीएमएस प्रणाली (mahavastu.maharashtra.gov.in) कालपासून कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे नागरिकांना विकास परवानगी आणि बांधकाम आराखडे मंजूर करतानाच एकाच ठिकाणी रूपांतरण अधिमूल्य भरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

**पुढील सुधारणा युद्धपातळीवर-** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, बीपीएमएसच्या धर्तीवर ऑटो **(पान 2 वर)**



### अधिमूल्य भरण्याची सुलभ सुविधा

या प्रणालीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे बिगरशेती वापरासाठी आवश्यक असणारे एकरकमी अधिमूल्य आता पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने भरता येणार आहे. त्यामुळे नागरिकांना सरकारी कार्यालयात जाण्याची गरज उरणार नाही. अधिमूल्य भरल्यानंतर त्याची माहिती महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीशी जोडली जाईल आणि सातबारा उताऱ्यावर त्याची नोंद आपोआप होणार आहे.

### पारदर्शकता आणि गती वाढणार

यापूर्वी नागरिकांना अकृषिक परवानगी मिळवण्यासाठी अनेक महिने प्रतीक्षा करावी लागत होती. मात्र ही प्रक्रिया डिजिटल केल्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होणार असून पारदर्शकता वाढणार आहे. 10 फेब्रुवारीच्या शासन निर्णयातील तरतुदींना या प्रणालीमुळे गती मिळणार असून 'Ease of Doing Business' ला चालना देणे हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश आहे.

## CSMT स्थानकावर मोठा गोंधळ, दोन लोकल समोरासमोर

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) सारख्या अत्यंत वर्दळीच्या स्थानकावर आज एक धक्कादायक घटना घडली आहे. दोन लोकल गाड्या एकाच ट्रॅकवर आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. मोटरमनने वेळीच लोकल थांबवल्याने मोठा अपघात टळला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत स्टेशन मास्तरला निलंबित केलं आहे. सीएसएमटी स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक 5 वर आधीच एक लोकल उभी असताना, दुसरी लोकल त्याच ट्रॅकवर आली. सिग्नलच्या चुकीच्या नियोजनामुळे गाडी प्लॅटफॉर्म 4 ऐवजी 5 कडे वळवण्यात आली. मोटरमनच्या प्रसंगावधानाने वेळीच ब्रेक लागला आणि शेकडो प्रवाशांचे प्राण वाचले. जर हा वेग थोडा जास्त असता किंवा मोटरमनने ब्रेक लावला नसता तर मोठा अपघात होण्याची शक्यता होती. **(पान 2 वर)**




# उष्णतेची लाट, वादळी वारा अन् पावसासोबत गारा; महाराष्ट्रावर तिहेरी संकट

**पुढील चार दिवसांचा सतर्कतेचा इशारा**





ठाणे - भारतीय हवामान विभाग (आयएमडी) यांनी 20 एप्रिल 2026 रोजी जाहीर केलेल्या पाच दिवसीय अंदाजानुसार, राज्यात 20 ते 24 एप्रिलदरम्यान हवामानात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. या कालावधीत वादळी वारे, विजांचा कडकडाट, गारपीटसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील अनेक जिल्ह्यांना विशेष सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वतीने नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. मंगळवार सकाळपासूनच मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये ढगाळ वातावरण तर काही भागांमध्ये मेघगर्जना पाहायला मिळाली. **(पान 2 वर)**

### सतर्कतेचा इशारा

अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरावरून बाष्पयुक्त वारे प्रवाही होत असतानाच या वाऱ्यांचा प्रभाव पुढील तीन ते चार दिवसांत वाढणार असल्यामुळे रायगड, पुणे, कोल्हापूरसह 18 जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

### प्रशासनासाठी सूचना

ग्रामपंचायत, पोलीस आणि आरोग्य विभागांनी तातडीने जनजागृती मोहीम राबवावी. रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि आपत्कालीन पथके सतर्क ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शाळा, सभागृह आणि सार्वजनिक इमारती तात्पुरत्या निवाऱ्यासाठी खुल्या ठेवाव्यात. हवामान खात्याचे अद्ययावत इशारे गावपातळीपर्यंत त्वरीत पोहोचवण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

### शेतकरी आणि आयोजकांसाठी विशेष इशारा

शेतकऱ्यांनी वीज आणि वादळी वाऱ्यांच्या काळात शेतातील कामे टाळावीत. बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी कामकाज तात्पुरते थांबवावे. तसेच यात्रा, धार्मिक कार्यक्रम आणि मोठ्या गर्दीचे कार्यक्रम पुढे ढकलण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने सर्व यंत्रणांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना

विजांचा कडकडाट सुरू होताच तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली उभे राहणे, मोकळ्या शेतात थांबणे किंवा पाण्याजवळ जाणे टाळावे. तसेच लोखंडी वस्तूंपासून दूर राहावे. अशा परिस्थितीत मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे.



# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## मणिपूरची दुखरी नस

ईशान्य भारतातील मणिपूर हे राज्य गेल्या काही काळापासून अस्थिरतेच्या भोवऱ्यात अडकले आहे. जातीय तणाव, हिंसाचार, विस्थापन आणि भीतीचे सावट या सगळ्यांमुळे तेथील जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सत्ताधारी भाजपावर केलेला, भाजपने मणिपूर पेटवून दिला, हा आरोप केवळ राजकीय वक्तव्य म्हणून न पाहता, त्यामागील वास्तव आणि परिणाम यांचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. राहुल गांधींनी भाजपची दुखरी नस पकडली आहे. मणिपूरमधील संघर्ष हा प्रामुख्याने मतैई आणि कुकी–झो या समुदायांमधील आहे. अनुसूचित जमाती दर्जाच्या मागणीवरून पेटलेला हा वाद लवकरच हिंसाचारात परिवर्तित झाला. परंतु, हा संघर्ष केवळ एका प्रशासकीय निर्णयाचा परिणाम आहे का, की त्यामागे दीर्घकालीन सामाजिक असंतोष आणि राजकीय दुर्लक्ष दडले आहे, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. यामुळे राहुल गांधी यांनी भाजपला डिवचले आहे.

मणिपूरचा इतिहास पाहिला तर, मणिपूरमध्ये विविध समुदायांमध्ये सांस्कृतिक आणि भौगोलिक भेद कायम राहिले आहेत. डोंगराळ भागातील आदिवासी समुदाय आणि मैदानी भागातील मतैई यांच्यातील संसाधनांचे वाटप, राजकीय प्रतिनिधित्व आणि ओळख यावरून तणाव आधीपासूनच होता. मात्र, हा तणाव हिंसाचारात बदलणे हे प्रशासनाच्या अपयशाचे द्योतक आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार आणि राज्यातील भाजप सरकारवर राहुल यांचा सर्वात मोठा आरोप हा आहे की, त्यांनी परिस्थिती हाताळण्यात विलंब केला. हिंसाचार सुरू झाल्यानंतर दीर्घकाळ ठोस हस्तक्षेप न झाल्याने परिस्थिती बिघडत गेली. गृहव्यवस्था हा राज्याचा विषय असला, तरी जेव्हा एखाद्या राज्यात जवळपास गृहयुद्धासारखी परिस्थिती निर्माण होते, तेव्हा केंद्र सरकारची भूमिका निर्णायक ठरते. हजारो लोक विस्थापित झाले, शेकडो मृत्यू झाले, आणि लाखो लोक भयभीत झाले या पार्श्वभूमीवर केंद्राची प्रतिक्रिया उशिरा आणि अपुरी वाटते, ही टीका केवळ विरोधकांची नाही तर अनेक तटस्थ निरीक्षकांचीही आहे.

राहुल गांधी यांनी मणिपूरला भेट देत हिंसाचारग्रस्तांची विचारपूस केली. त्यांच्या भारत जोडो विचारसरणीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी एकसंध, सलोख्याचा भारत हा संदेश दिला. द्वेषाला द्वेषाने उत्तर नाही, हा त्यांचा आग्रह राजकीय दृष्ट्या आकर्षक असला, तरी त्याची अंमलबजावणी कशी होणार, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. राहुल यांनी भाजपवर केलेले आरोप अल्पसंख्याकांना धमकावणे, भीतीचे वातावरण निर्माण करणे आणि सत्तेचे केंद्रीकरण हे गंभीर स्वरूपाचे आहेत. परंतु, या आरोपांना ठोस पुरावे आणि पर्यायी धोरणे जोडली गेली पाहिजेत. केवळ टीका करून प्रश्न सुटत नाहीत; त्यासाठी व्यावहारिक उपाययोजना आवश्यक असतात. राहुल गांधी यांनी भाजपच्या धोरणांवर टीका करताना, एकच परंपरा, एकच भाषा, एकच इतिहास या विचारसरणीवर आक्षेप घेतला. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात हा मुद्दा अत्यंत संवेदनशील आहे. संघराज्यीय व्यवस्थेत प्रत्येक राज्याला स्वतःची ओळख, संस्कृती आणि प्रशासनाची स्वायत्तता असते. मणिपूरसारख्या राज्यांमध्ये ही स्वायत्तता आणि स्थानिक प्रश्नांची जाण अत्यंत महत्त्वाची ठरते. जर केंद्राकडून अतिरेकी हस्तक्षेप झाला, तर स्थानिक असंतोष वाढू शकतो, ही भीती विरोधक व्यक्त करतात.

तामिळनाडूमधील राजकीय सभांमध्ये राहुल गांधी यांनी अण्णाद्रमुकवरही टीका केली. भाजपसमोर शरणागती पत्करल्याचा आरोप त्यांनी केला. हे वक्तव्य केवळ मणिपूरपुरते मर्यादित नसून, राष्ट्रीय राजकारणातील व्यापक सत्तासंघर्षाचे प्रतीक आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अशा आरोपांची तीव्रता वाढते, हे स्वाभाविक आहे. मात्र, यामुळे मूळ प्रश्न मणिपूरमधील शांतता आणि पुनर्बांधणी हे बाजूला पडण्याचा धोका निर्माण होतो. मणिपूरच्या प्रश्नावर राष्ट्रीय माध्यमांमध्ये अपेक्षित तेवढे लक्ष दिले गेले नाही, हीही एक टीका आहे. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या घटनांमुळेच अनेकांना परिस्थितीची कल्पना येते. अशा परिस्थितीत सत्य आणि अफवा यामधील सीमारेषा धूसर होते. राजकीय पक्ष या परिस्थितीचा वापर स्वतःच्या अजेंड्यासाठी करतात, हेही वास्तव आहे. त्यामुळे नागरिकांनी माहितीचे विश्लेषण करणे आवश्यक ठरते.

मणिपूरमधील परिस्थिती सुधारण्यासाठी काही ठोस उपायांची गरज आहे: केंद्र सरकारने मणिपूर राज्याशी संवादाची प्रक्रिया सुरू करणे गरजेचे होते, तसेच सर्व समुदायांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी तटस्थ मध्यस्थी करणे आवश्यक होते. हिंसाचार रोखण्यासाठी प्रभावी आणि निष्पक्ष कारवाई करणे गरजेचे होते, विस्थापित नागरिकांसाठी दीर्घकालीन पुनर्वसन योजना राबविली जाणे अपेक्षित आहे, केंद्र आणि राज्य सरकारने एकत्र येऊन प्रश्न सोडवण्याची तयारी दाखविण्याची गरज होती. विविध समुदायांमध्ये सलोखा वाढवण्यासाठी सामाजिक उपक्रम सुरू करणे आवश्यक आहे, जेणेकरून तेथील जनतेत स्नेहभाव, बंधुता वाढणे आवश्यक होते. या गोष्टी केंद्र सरकारला करता आल्या असत्या. राहुल गांधी यांचे आरोप आणि भाजपचे प्रत्युत्तर या सगळ्या राजकीय वादळात मणिपूरमधील सामान्य नागरिक मात्र सर्वाधिक त्रस्त आहे. मणिपूरमधील जनतेला ना राजकीय भाषणे हवीत, ना आरोप–प्रत्यारोप; त्याला हवी आहे शांतता, सुरक्षितता आणि स्थैर्य. ते कोण देऊ शकेल ? अर्थातच केंद्र सरकार तसा प्रयत्न करू शकते, तेही इच्छाशक्ती असल्यास. अन्यथा मणिपूरमध्ये जैसे थे परिस्थिती राहू शकते. आज गरज आहे ती राजकीय प्रगल्भतेची. सत्ताधारी असो वा विरोधक, दोघांनीही आपल्या भूमिकांचा पुनर्विचार करून, राष्ट्रहिताला प्राधान्य द्यावे. मणिपूर हे केवळ एक राज्य नाही; तो भारताच्या विविधतेचा आणि एकतेचा कस पाहणारा प्रश्न आहे. जर या प्रश्नाकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहिले गेले, तर तो अधिक गुंतागुंतीचा होईल. पण जर त्याकडे मानवी दृष्टिकोनातून पाहिले, तरच त्यावर टिकाऊ उपाय सापडू शकतील.

## म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करताना कोणत्या गोष्टी टाळाव्यात? दुर्लक्ष केल्यास मोठं नुकसान होण्याचं संकट

नवी दिल्ली : गेल्या दोन वर्षांपासून शेअर बाजारात मोठी अस्थिरता असल्यानं मुच्युअल फंड गुंतवणूकदारांना अपेक्षेप्रमाणं परतावा मिळालेला नाही. शेअर बाजारातील घसरणीमुळं बहुतांश म्युच्युअल फंडचा परतावा शून्य झाला आहे. अनेक गुंतवणूकदार म्युच्युअल फंडमधून अपेक्षेप्रमाणं परतावा मिळत नसल्यानं काय करावं असा विचार करत आहेत. म्युच्युअल फंड संदर्भातील निर्णय घेताना चुका करु शकतात. त्या चुकांमुळं मोठं नुकसान होऊ शकतं, हे नुकसान टाळण्यासाठी काही गोष्टी लक्षात घेणं महत्त्वाचं आहे.

**म्युच्युअल फंड गुंतवणूक करताना कोणत्या चुका टाळाव्यात? -** बाजारातील घसरणीवेळी एसआयपी थांबवणं : जेव्हा युद्ध किंवा आर्थिक मंदीच्या बातमीमुळं शेअर बाजार घसरतो तेव्हा बहुतांश गुंतवणूकदार भीतीमुळं एसआयपी बंद करतात. हीच सर्वात मोठी चूक असते. जेव्हा शेअर बाजारात घसरण होत असते तेव्हा एसआयपीमध्ये अधिक यूनिट मिळतात. ज्याला रुपी कॉस्ट अवरेजिंग म्हटलं जातं. जेव्हा बाजारात पुन्हा तेजी येते तेव्हा या यूनिटसमधून तुम्हाला अधिक नफा मिळतो.

चांगली कामगिरी करणाऱ्या फंडच्या मागं धावणे: बहुतांश गुंतवणूकदार 3 ते 5 वर्षांचा परताा पाहून कोणत्यातरी म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करतात. एखाद्या फंडानं काही वर्ष चांगला परतावा दिला आहे तो पुढील वर्षी चांगला परतावा देईल असं सांगता येत नाही. फंडनं दिलेला रिटर्न




किंवा जुना परतावा न पाहता, त्याची क्वालिटी पाहून गुंतवणूक केली पाहिजे.

NAV च्या घसरणीला घाबरणे: अनेकदा म्युच्युअल फंडच्या NAV ची किंमत कमी झाली म्हणजे तुमचे पैसे बुडाले असं होत नाही. ही बाजारातील अस्थायी स्थिती असते. मात्र, कमी किमतीवर अनेक यूनिटस खरेदी करण्याची संधी मिळते.

योग्य वेळेची वाट पाहणे : शेअर बाजारात केव्हा घसरण होईल आणि शेअर बाजारात कधी तेजी येईल हे जगभरातील मोठे मोठे दिग्गज देखील सांगू शकत नाहीत. त्यामुळं योग्य वेळेची वाट न पाहता सातत्यानं गुंतवणूक करत राहणं आवश्यक आहे. बाजारात घालवलेला वेळ, बाजाराचं टायमिंग महत्त्वाचं असतं.

सर्व पैसे एकाच योजनेत गुंतवणे : अनेकदा बहुतांश गुंतवणूकदार सर्व रक्कम एकाच म्युच्युअल फंड योजनेत गुंतवतात. जर, त्या फंडनं चांगला परतावा दिला नाही तर मोठं नुकसान होऊ शकतं. त्यामुळं एक समजूतदार गुंतवणूकदार म्हणून आपले पैसे वेगवेगळ्या योजनेत गुंतवणं आवश्यक आहे.

कोणत्याही ध्येयाशिवाय गुंतवणूक : म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी ध्येय निश्चित न करता निर्णय घेणं चुकीचं ठरू शकतं. मुलांच शिक्षण, निवृत्तीचं प्लॅनिंग अशा ध्येयांशिवाय गुंतवणूक करणं चुकीचं ठरू शकतं. ध्येय निश्चित न करता गुंतवणूक केल्यास तुम्ही मध्येच पैसे काढू शकता. त्यामुळं तुमचं आर्थिक नुकसान होऊ शकतं. यासाठी मुच्युअल फंड निवडण्यापूर्वी वित्तीय ध्येय निश्चित केलं पाहिजे.

(टीप- शेअर बाजार, म्यूच्यूअल फंड हे जोखमीच्या अधीन असतात. या लेखात दिलेली माहिती ही प्राथमिक स्वरुपाची असून आम्ही कोणताही दावा करत नाही. या लेखामागचा गुंतवणुकीसाठी शिफारस, सल्ला देण्याचा उद्देश नाही. तुम्हाला गुंतवणूक करायची असेल तर या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला घ्या.)

## आज अमेरिका-इराणमध्ये निर्णायक चर्चेची शक्यता

**(पान 1 वरून )** चर्चेसाठी तयार झाले आहे. इराणच्या वाटाघाटी टीमचे नेतृत्व करणारे मोहम्मद बाघर गालिबाफ यांनी ‘एक्स’वर पोस्ट करत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर निशाणा साधला. “इराण दबावाखाली येऊन शरण जाणार नाही किंवा धमक्यांना बळी पडून चर्चा करणार नाही,” असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, न्यूयॉर्क टाइम्सच्या वृत्तानुसार, जे.डी. व्हान्स उपस्थित राहणार असतील, तर गालिबाफ स्वतः या चर्चेत सहभागी होतील.

## देश तोडण्याचा डाव

**(पान 1 वरून )** पण हे पुचाटांचा कारभार आहे. महाराष्ट्राने तर हे सहन करता कामा नये. या महाराष्ट्राने प्रत्येक वेळेला देशाला दिशा दाखवली आहे. प्रत्येक वेळा देश संकटात असताना महाराष्ट्र धावून गेला आहे हा इतिहास आहे. जर महाराष्ट्रावर अन्याय होत असेल जसा बंगालमध्ये बंगाली उभा राहिला आहे, तामिळनाडूमध्ये तमिळी उभा राहिला आहे तसं महाराष्ट्रात तुम्हाला महाराष्ट्रीय म्हणून उभं राहिले पाहिजे.', असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना केले.

## बंगालमध्ये वाघीण एकटीच लढतेय

**(पान 1 वरून )** मतदान करणार कसं, कोण करणार? तुमची हिंमत आहे मतदान करण्याची? जर ममता बॅनर्जी हरल्या तर तिथं जिंकण्याचे क्रेडिट हे घेतील. ही लोकशाही आहे? योगी आदित्यनाथ तिकडे, पंतप्रधान तिकडे, आमचे मुख्यमंत्री बंगालमध्ये. या राज्यात मात्र ड्रग्जचे रॅकेट सुरू आहे. भोंदूगिरी सुरू आहे. महिलांचे शोषण सुरू आहे. पण आम्हाला त्याचे काही नाही. महाराष्ट्र जिंकला, मग बंगाल जिंकायचा, मग आसाम, मग इतर राज्य हेच सुरू आहे. कामगारांनी मोर्चा काढल्यावर हे पाकिस्तानचं कारस्थान असल्याचा आरोप करण्यात येतो. नोएडात हेच घडलं. म्हणजे आता न्यायहक्कासाठी कामगाराने रस्त्यावर उतरू नये का असा सवाल ठाकरेंनी केला.

## अखेर पैलवान खाशाबा जाधव यांना मिळणार मरणोत्तर पद्मविभूषण

**(पान 1 वरून )** 'कुस्तीवीर खाशाबा जाधव फाउंडेशन'च्या वतीने नोव्हेंबर 2025 मध्ये याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी करताना कोल्हापूर सर्किट बेंचने केंद्र सरकारला झापले असून 4 मे 2026 पूर्वी यावर अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. सरकारच्या वेळकाढू धोरणामुळे हा सन्मान इतकी वर्षे रखडल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने खाशाबा जाधवांच्या ऐतिहासिक कामगिरीची दखल घेण्यास सांगितले आहे.

**फाईल गहाळ ते कोर्टाची पायरी, रणजित जाधवांचा संघर्ष -** खाशाबा जाधव यांचे सुपुत्र रणजित जाधव यांनी आपल्या वडिलांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रदीर्घ लढा दिला आहे. 2017 मध्ये खाशाबा जाधवांच्या पद्मविभूषण पुरस्काराची फाईल सरकार दरबारी गहाळ झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. तत्कालीन राज्य सरकारने केंद्राकडे शिफारस करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र त्याची पूर्तता न झाल्याने अखेर रणजित जाधव यांनी न्यायालयाचे दार ठोठावले होते.

## CSMT स्थानकावर मोठा गोंधळ, दोन लोकल समोरासमोर

**(पान 1 वरून ) स्टेशन मास्तर निलंबित -** रेल्वे प्रशासनाने तातडीने पावले उचलत संबंधित स्टेशन मास्तरला निलंबित केले आहे. प मुंबईची लाईफलाईन म्हटल्या जाणाऱ्या या लोकल सेवेवर रोज लाखो मुंबईकर विश्वास ठेवून प्रवास करतात. . गेल्या काही काळात तांत्रिक बिघाड, रुळांना तडे जाणे आणि आता सिग्नलची चूक अशा घटनांचे प्रमाण वाढले आहे. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. मात्र ज्या स्टेशन मास्तरमुळे सिग्नल चुकीचे पडले त्या स्टेशन मास्तरवर मध्य रेल्वेकडून कारवाई करण्यात आली आहे.

**मध्य रेल्वेची वाहतूक सुरूळीत करण्याचा प्रयत्न -** मस्जिद बंदर आणि मुंबई सीएसएमटी स्थानकादरम्यान लोकलच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. कल्याण ते मुंबई सीएसएमटी स्थानका दरम्यान धावणारी जलद लोकल मस्जिद बंदर रेल्वे स्टेशनच्या अलीकडे थांबवण्यात आली होती. सध्या मध्य रेल्वेची वाहतूक सुरूळीत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**सोमवारीही मध्य रेल्वेचा खोळंबा -** काल (20 एप्रिल) सकाळी डोंबिवली स्थानकावरून कल्याणकडे जात असलेली धीम्या मार्गावरील लोकलचा एक डब्बा रुळावरून खाली घसरला होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर लोकल वाहतूकीमध्ये मोठा खोळंबा झाला होता. त्याप्रमाणेच आज सकाळी देखील लोकल सेवा 15 ते 20 मिनिटे उशिराने धावत होती. सतत वाहतुकीमध्ये होत असलेल्या खोळंब्यामुळे नोकरदार या समस्येला कमालीचे संतापले आहेत.

## उष्णतेची लाट, वादळी वारा अन् ...

**(पान 1 वरून )** ही स्थिती राज्यातील 18 जिल्ह्यांमध्ये पाहायला मिळणार आहे. अतीप्रमाणातील बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे पावसास पूरक वातावरणनिर्मिती होत असल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## आजपासून एनए झाले सोपे !

**(पान 1 वरून )** डीसीआर प्रणालीमध्येही आवश्यक सुधारणा करण्यात येत आहेत. पुढील 10 दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होईल, ज्यामुळे मोठ्या विकास प्रकल्पांच्या मंजुरीला अधिक वेग मिळणार आहे.

## शरद पवार ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल, बारामती दौरा रद्द

**(पान 1 वरून )** मिळणार होता. मात्र डॉक्टरांनी आराम करण्याचा सल्ला दिल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्येच ठेवण्यात आले आहे. सुप्रिया सुळे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, शरद पवार यांना नियमित तपासणी आणि काही महत्त्वाच्या वैद्यकीय चाचण्यांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्या विविध चाचण्या सुरू असून, अहवाल आल्यानंतरच त्यांच्या प्रकृतीबाबत स्पष्ट माहिती मिळू शकेल.

**पूर्वीही झाले होते रुग्णालयात दाखल -** गेल्या महिन्यातही प्रकृती बिघडल्यानंतर शरद पवार यांना पुण्यातील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. काही दिवसांच्या उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले होते, पण आता पुन्हा एकदा त्यांना रुग्णालयात भरती व्हावे लागले आहे.

**बारामतीच्या महत्त्वाच्या सभेला राहणार अनुपस्थित -** रुग्णालयात दाखल असल्यामुळे शरद पवार त्यांच्या नियोजित कार्यक्रमांना उपस्थित राहू शकणार नाहीत. बारामतीमध्ये होणारी प्रचाराची सांगता सभा अत्यंत महत्त्वाची मानली जात होती, परंतु प्रकृतीच्या कारणास्तव ते यात सहभागी होणार नाहीत.

## युद्धामुळे झालेल्या नुकसानासाठी UAE ने अमेरिकेकडे मागितली आर्थिक गॅरंटी

अबूधाबी, दि. २१ : इराण विरोधात अमेरीका आणि इस्राइलने पुकारलेल्या युद्धामुळे आखाती देशांमध्ये मोठे नुकसान झाले आहे. याची भरपाई आता अमेरिकेला करावी लागणार आहे. UAE ने युद्धासाठी अमेरिकेला जबाबदार धरलं आहे. युद्धाची सुरुवात अमेरिकेनं केलेली असल्यानं त्यांनीच युद्धाचा खर्च उचलावा, अशी मागणी यूएईनं केली आहे. २८ फेब्रुवारीपासून सुरु झालेल्या युद्धात आखाती देशांचं प्रचंड नुकसान झालं आहे. इराणच्या युद्धात झालेल्या नुकसानाबद्दल UAE ने अमेरिकेकडे आर्थिक गॅरंटी मागितली आहे. युद्ध काळात इराणनं UAE तील ऊर्जा प्रकल्पांवर प्रामुख्यानं हल्ले चढवले. त्यासाठीच्या डागडुजीवर ६० बिलियन डॉलरपेक्षा अधिकचा खर्च येण्याचा अंदाज आहे. आखाती देशांमध्ये युद्धाचा सर्वाधिक फटका यूएईला बसला आहे. इराणच्या ड्रोन आणि क्षेपणास्त्रं हल्ल्यांमध्ये दुबईचं मोठं नुकसान झालं आहे.

UAE ची मागणी अमेरिकेसाठी आर्थिक संकटांना आमंत्रण देणारी ठरु शकते. कारण यूएई पाठोपाठ आखातमधील अन्य देशही अशाच प्रकारची मागणी करु शकतात. तसं झाल्यास अमेरिकेवर मोठा आर्थिक बोजा पडू शकतो. आखातीमधील सगळ्याच देशांनी युद्धामुळे झालेल्या नुकसानाची वसुली अमेरिकेकडून मागितल्यास अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अडचणी वाढू शकतात.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

ठाणे शहरातील सर्व सर्व्हिस सेंटर मधील बाहने धुणे व इतर साफसफाईची कामे करण्यास निर्बंधाबाबत.

सद्यस्थितीत तीव्र उन्हाळा सुरु असुन उन्हामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे व गावे यांना पाणी पुरवठा करणाऱ्या धरणात पाणी साठा दिवसेंदिवस अत्यंत कमी होत आहे. त्याचप्रमाणे ठाणे शहरातील सर्व विहीरी व कुपनलिकांची पाण्याची पातळी अत्यंत कमी होत आहे. वरील कारणामुळे भविष्यात तीव्र पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता असल्याने पाण्याची बचत करणे अत्यंत आवश्यक आहे.त्याकरीता प्रभावी उपाय योजना म्हणून ठाणे शहरातील सर्व सर्व्हिस सेंटर दि. १० जून २०२६ पर्यंत दोन चाकी, तीन चाकी, चार चाकी वाहने, इतर वाहने धुणे व इतर साफसफाई करणेच्या कामावर महापालिकेमार्फत निर्बंध घालण्यात आले आहेत. वरील आदेशाचे उल्लंघन झाल्यास आपल्या सर्व्हिस स्टेशनवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

ठामपा/पिआरओ/पा.पु-मु/६१/२०२६-२७ — सही/-
दि:२१.०४.२०२६ — उपनगरअभियंता
Pls visit our oficial web-site — ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

**पाणी अनमोल आहे, पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवा.**
**पाणी वाचवा पाण्याचा अपव्यय / नासाडी टाळा.**


## उद्या निसर्ग नाहीसा झाला तर...?

### एक अस्वस्थ करणारी कल्पना, एक कठोर सत्य

**कल्पना करा... एक सकाळ तुम्ही जागे होता. पण पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येत नाही... खिडकी उघडता, पण ताजी हवा नाही—श्वास घ्यायलाच त्रास होतो... नदी आहे, पण तिचं पाणी इतकं दूषित आहे की पिणं तर दूरच, स्पर्श करायलाही भीती वाटते... आणि झाडं? ती फक्त जुन्या फोटोंमध्ये आणि पुस्तकांमध्ये उरली आहेत...**

ही कल्पना भयानक वाटते ना? पण ही केवळ कल्पना नाही—आपण हळूहळू त्या वास्तवाच्या दिशेने चाललो आहोत. दरवर्षी २२ एप्रिलला ‘पृथ्वी दिन’ साजरा केला जातो. पण हा केवळ उत्सव नाही—तो एक इशारा आहे... एक जागृती आहे... आपल्या अस्तित्वावर आलेल्या संकटाची जाणीव करून देणारा दिवस आहे. निसर्ग आपल्याला सगळं देतो—शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, अन्न, आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे जीवन. पण आपण त्याला काय देतो? उत्तर थोडं कठोर आहे— प्रदूषण, जंगलतोड आणि दुर्लक्ष.

-मदन मोहन चव्हाण, योगदान फाउंडेशन — जिथे प्रत्येक प्रयत्न हा निसर्गासाठी असतो

**पृथ्वी दिन विशेष**

### आज आपण विकासाच्या नावाखाली निसर्गाचा समतोल बिघडवत आहोत:

मोठमोठ्या इमारतींसाठी हजारो झाडं तोडली जात आहेत. उद्योगांमधून घातक वायू हवेला विषारी बनवत आहेत. नद्या कचरा आणि रसायनांनी दूषित होत आहेत . हवामान बदलामुळे कधी दुष्काळ, तर कधी महापूर येत आहेत . आज परिस्थिती अशी आहे की, शहरांमध्ये श्वास घेणं कठीण झालं आहे...गावांमध्ये पाण्यासाठी लोकांना मैलोनमैल चालावं लागतं... निसर्ग जणू आपल्याला वारंवार इशारा देत आहे—पण आपण तो ऐकतो आहोत का?निसर्गाचं रक्षण करणं म्हणजे,




आपल्या आयुष्याचं रक्षण करणं आहे. आपण निसर्ग वाचवत नाही... आपण स्वतःचं भविष्य वाचवत आहोत. अजूनही वेळ गेलेली नाही— पण वेळ नक्कीच कमी आहे.

मोठे बदल नेहमी छोट्या कृतींनी सुरू होतात: दरवर्षी किमान एक झाड लावा , प्लास्टिकचा वापर कमी करा , पाणी आणि वीज वाचवा , पर्यावरणाबद्दल इतरांना जागरूक करा ही कामं लहान वाटतात— पण त्यांचा परिणाम खूप मोठा असतो. जर प्रत्येकाने आज एक छोटा निर्णय घेतला— “आजपासून मी निसर्गाची काळजी घेणार,” तर उद्या आपली पृथ्वी पुन्हा हिरवीगार होऊ शकते. आजची पिढी जर जागी झाली, तर उद्याचं भविष्य बदलू शकतं. निसर्ग आपल्याशिवाय टिकू शकतो... पण आपण निसर्गाशिवाय नाही. शेवटी एक साधा पण विचार करायला लावणारा प्रश्न— “आपल्या मुलांना आपण निसर्ग देणार, की फक्त त्याच्या आठवणी?” निर्णय आज घ्यायचा आहे...कारण उद्या कदाचित उशीर होईल. आज निर्णय घेतला, तर उद्या वाचेल... नाहीतर उद्या उशीर होईल.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

ठाणे शहरातील नागरीकांना पाणी बचतीचे जाहीर आवाहन

सद्यस्थितीत तीव्र उन्हाळा असल्यामुळे धरणातील पाणी साठ्याचे बाष्पीभवन होऊन दिवसेंदिवस पाणी साठा सातत्याने कमी होत आहे. त्याचप्रमाणे विहिरी व कपनलिकांचे पाण्याच्या पातळीमध्ये मोठ्या प्रमाणात घट आलेली आहे. यामुळे पाऊस सुरु होईपर्यत ती पाणीचाई निर्माण होऊ नये म्हणून शहरातील नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करुन पाणी बचत करावी.

१) शक्यतो रोज गाड्या धुवू नयेत त्या ऐवजी बोअरवेलच्या पाण्याने ओल्या केलेल्या कपड्याने गाड्या पुसाव्यात.
२) अंगणात शक्यतो पाणी मारु नये.
३) नळ सुरु ठेऊन कपडे धुणे, भांडी घासणे, दात घासणे, दाढी करणे टाळावे.
४) घरातील नळांची गळती दुरुस्त करावी.
५) सोसायटीतील गळकी टाकी, पाईप, व्हॉल्व्ह दुरुस्त करावेत. इमारतीच्या छतावरील टाकी ओव्हरफ्लो होवू नये याची दक्षता घ्यावी. अन्यथा तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा आढळून आल्यास संबंधीत इमारतीचे / सोसायटीचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येईल.
६) शक्यतो रोज आंघोळीसाठी शांवर व टव वाथचा वापर करु नका.
७) स्वच्छतागृहामध्ये डुअल फ्लशचा वापर करावा.
८) इमारतीतील जिने धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरु नये.
९) पाण्याचा अनावश्यक साठा करु नये व साठा केलेले पाणी रोज सकाळी ओतून देण्याची सवय बंद करावी.
१०) इमारती / सोसायटी / संकुलांमधील तरण तलावास पिण्याचे पाणी वापरु नये व वारंवार पाणी बदलण्यात येऊ नये,
११) शक्यतो आठवड्यातील ५ दिवस धुण्यायोग्य सगळे कपडे एकत्र करुन एकाच दिवशी धुवावेत. इतर दिवशी गरज पडल्यास दररोज लागणारे छोटे कपडे हाताने कमी पाण्यात धुवावेत.
१२) कपडे धुण्याचे मशीन आठवड्यातून एकदा किंवा अगदी आवश्यक असेल तेव्हा दोनदाच आणि ते पुर्ण क्षमतेने वापरावे. (याने खूपच प्रमाणात पाण्याची बचत / मशीनचा पूर्ण क्षमतेने वापर होतो.)
१३) कपडे धुण्याचे मशीन किंवा हाताने कपडे धुवून निर्माण होणारे निरुपयोगी पाणी साठवण करुन पुढचे २ दिवस वापरावे जसे शक्य असेल तसे फ्लश, बाथरुम धुणे, फरशी पुसणे, गाड्या धुणे व बगीचा इत्यादीसाठी वापरावे.
१४) सद्यस्थितीत तीव्र उन्हाळा असल्यामुळे धरणातील पाणी साठा अत्यल्प झाला आहे. आपण एक जबाबदार नागरीक म्हणून पाण्याचा अपव्यय टाळून पाणी वाचवुया व या टंचाईच्या संकटाचा एकत्र सामना करुया. वरील सर्व कर्तव्य आपण एक जबाबदार नागरीक म्हणून पार पाडाल याचा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.

**पाणी अनमोल आहे, पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवा.**
**पाणी वाचवा पाण्याचा अपव्यय / नासाडी टाळा.**

ठामपा/पिआरओ/पा.पु-मु/६२/२०२६-२७ — सही/-
दि:२१.०४.२०२६ — उपनगर अभियंता
Pls visit our oficial web-site — ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in




## भारतीय रेल्वे वित्त महामंडळ

INDIAN RAILWAY FINANCE CORPORATION
A NAVRATNA CPSE UNDER MINISTRY OF RAILWAYS
Future on Track

■ पदाचे नाव & तपशील:
1 असिस्टंट 16
2 असिस्टंट मॅनेजर (फायनान्स) 07
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: (i) 60% गुणांसह B.Com (ii) ICAI / ICMAI कडून मध्यवर्ती परीक्षा उत्तीर्ण
पद क्र.2: (i) 60% गुणांसह B.Com (ii) ICAI / ICMAI कडून CA/CMA किंवा MBA (Finance) / PG डिप्लोमा (Management-Finance)
■ वयाची अट: 01 जानेवारी 2026 रोजी 18 ते 30 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: नवी दिल्ली/संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹500/- [SC/ST/ExSM/ट्रांसजेंडर: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 01 मे 2026 (11:45 PM)
■ परीक्षा: जून 2026
■ अधिकृत संकेतस्थळ https://irfc.co.in/hi

## राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र

■ पदाचे नाव & तपशील:
1 सायंटिस्ट-B कॉम्प्युटर सायन्सेस & IT 168
इलेक्ट्रॉनिक्स & कम्युनिकेशन 25
डेटा सायन्स & AI 50
■ शैक्षणिक पात्रता: (i) B.E/B.Tech/M.E./M.Tech/M.Sc (Electronics, Electronics and Communication, Computer Sciences, Communication, Computer and Networking Security, Computer Application, Software System, Information Technology, Information Technology Management, Informatics, Computer Management, Cyber law, Electronics and Instrumentation) (ii) GATE 2024/2025/2026
■ वयाची अट: 31 मार्च 2026 रोजी 18 ते 30 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
Fee: General/OBC/EWS: ₹800/- [SC/ST/PWD/महिला: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 24 एप्रिल 2026
कागदपत्र पडताळणी आणि वैयक्तिक संवाद/ ■ मुलाखत: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://www.xn--m1bcw4hqd2b.xn--11b7cb3a6a.xn--h2brj9c/

## भारतीय नौदलात अग्निवीर (MR संगीतकार)

पदाचे नाव & तपशील:
1 अग्निवीर मेट्रिक रिक्रूट (MR संगीतकार)-02/2026 (July 2026) बॅच —
■ शैक्षणिक पात्रता: (i) 10वी उत्तीर्ण (ii) इन्स्ट्रुमेंटच्या ट्यूनिंगमध्ये प्रवीणता असलेले उमेदवार
■ शारीरिक पात्रता: उंची: किमान 157 सेमी.
■ वयाची अट: जन्म 01 जुलै 2004 ते 31 डिसेंबर 2008 च्या दरम्यान झालेला असावा.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: फी नाही.
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 26 एप्रिल 2026
■ अधिकृत संकेतस्थळ https://indiannavy.gov.in/

## न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

■ पदाचे नाव & तपशील:
1 एक्झिक्युटिव ट्रेनी [Executive Trainee (ET)]
मेकॅनिकल 125
केमिकल 40
इलेक्ट्रिकल 65
इलेक्ट्रॉनिक्स 50
इंस्ट्रूमेंटेशन 15
सिव्हिल 35
■ शैक्षणिक पात्रता: (i) 60% गुणांसह संबंधित शाखेत/विषयात BE/B.Tech/B.Sc (Engg.)/M.Tech (Mechanical/Chemical/Electrical/Electronics/Instrumentation/Civil) (ii) GATE 2024/2025/2026
■ वयाची अट: 30 एप्रिल 2026 रोजी 18 ते 26 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹500/- [SC/ST/PwBD/DODPKIA/महिला: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 30 एप्रिल 2026 (04:00 PM)
■ अधिकृत संकेतस्थळ https://www.npcil.nic.in/index.aspx

## इंडियन बँक

■ पदाचे नाव & तपशील:
इंडियन बैंक Indian Bank
1 स्पेशलिस्ट ऑफिसर (मॅनेजर & सिनियर मॅनेजर 350
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदव्युत्तर पदवी/B.E/ B.Tech (Computer Science/Computer Applications/ Information Technology/ Electronics/ Electronics & Telecommunications/ Electronics & Communication/ Electronics & Instrumentation) किंवा पदवीधर+MBA/PGDBA / PGDBM (Finance) किंवा CA/CFA किंवा समतुल्य (ii) 02/03/04/05 वर्षे अनुभव
■ वयाची अट: 01 एप्रिल 2026 रोजी 33/34/35/36 वर्षांपर्यंत [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹1000/- [SC/ST/PWD: ₹175/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 28 एप्रिल 2026
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianbank.bank.in/

## सशस्त्र सीमा बल कॉन्स्टेबल

■ पदाचे नाव & तपशील:
1 कॉन्स्टेबल (व्हेटरिनरी)
2 कॉन्स्टेबल (ड्रायव्हर)
3 कॉन्स्टेबल (गार्डनर)
4 कॉन्स्टेबल (वॉटर कॅरिअर)
5 कॉन्स्टेबल (कॉब्लर)
6 कॉन्स्टेबल (टेलर)
7 कॉन्स्टेबल (वॉशरमन)
8 कॉन्स्टेबल (बार्बर)
9 कॉन्स्टेबल (वेटर)
10 कॉन्स्टेबल (कारपेंटर)
11 कॉन्स्टेबल (नर्सिंग ऑर्डर्ली)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: (i) 10वी उत्तीर्ण (ii) 01 वर्षे अनुभव
पद क्र.2: (i) 10वी उत्तीर्ण (ii) अवजड वाहन चालक परवाना
पद क्र.3 ते 10: (i) 10वी उत्तीर्ण (ii) 02 वर्षे अनुभव किंवा संबंधित ट्रेड मध्ये ITI कोर्स +01 वर्ष अनुभव किंवा संबंधित ITI डिप्लोमा
पद क्र.11: (i) 10वी उत्तीर्ण (ii) 'सेंट जॉन्स ॲम्ब्युलन्स ऑर्गनायझेशन' (St. John's Ambulance Organisation) किंवा 'रेड क्रॉस सोसायटी ऑफ इंडिया' कडील प्रथमोपचार (First Aid) प्रमाणपत्र अभ्यासक्रम; (iii) केंद्र सरकार किंवा राज्य सरकारांनी मान्यता दिलेल्या, किमान 50 बेडची क्षमता असलेल्या रुग्णालय किंवा संस्थेमध्ये 'नर्सिंग ऑर्डरली' (Nursing Orderly) म्हणून किमान एक वर्षाचा कामाचा अनुभव.
■ वयाची अट: 19 एप्रिल 2026 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
पद क्र.1, 2 & 11: 18 ते 27 वर्षे
पद क्र.3 ते 9: 18 ते 23 वर्षे
पद क्र.10: 18 ते 25 वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹100/- [SC/ST/ExSM/महिला:फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 04 मे 2026
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाइट https://ssb.gov.in/

## भारतीय रिझर्व्ह बँक

■ पदाचे नाव & तपशील:
भारतीय रिज़र्व बैंक Reserve Bank of India भारत का केंद्रीय बैंक
1 ज्युनियर इंजिनिअर (Civil)
2 ज्युनियर इंजिनिअर (Electrical)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: 65% गुणांसह सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमा (SC/ST/PwBD: 55% गुण) + 02 वर्षे अनुभव किंवा 55% गुणांसह सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी (SC/ST/PwBD: 45% गुण) + 01 वर्ष अनुभव
पद क्र.2: 65% गुणांसह इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा (SC/ST/PwBD: 55% गुण) + 02 वर्षे अनुभव किंवा 55% गुणांसह इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी (SC/ST/PwBD: 45% गुण) + 01 वर्ष अनुभव
■ वयाची अट: 01 एप्रिल 2026 रोजी 20 ते 30 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹450+18% GST/- [SC/ST/PWD: ₹50+18% GST/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 06 मे 2026
■ परीक्षा: 06 जून 2026
■ अधिकृत वेबसाइट https://m.rbi.org.in//hindi/home.aspx

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ परीक्षेचे नाव: SSC Selection Posts XIV Exam 2026
■ पदाचे नाव & तपशील:
1 स्टेनोग्राफर
2 लॅबोरेटरी अटेंडंट
3 ज्युनियर इंजिनिअर
4 सायंटिफिक असिस्टंट
5 ड्रिलिंग असिस्टंट
6 स्टोअर क्लर्क
7 अकाउंटंट
8 स्टोअर अटेंडंट
9 रिसर्च असिस्टंट
10 सिनिअर सायंटिफिक असिस्टंट
उर्वरित रिक्त पदांकरिता कृपया जाहिरात पाहा किंवा येथे क्लिक करा
■ शैक्षणिक पात्रता: 10वी उत्तीर्ण/12वी उत्तीर्ण/पदवीधर पदवी आणि त्यावरील किंवा समतुल्य.
■ वयाची अट: 01 जानेवारी 2026 रोजी 18 ते 25/27/28//30 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: ₹100/- [SC/ST/PWD/ExSM/महिला: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 04 मे 2026 (11:00 PM)
■ परीक्षा: जून 2026
■ अधिकृत वेबसाइट https://ssc.gov.in/

## २५ एप्रिलला तहसीलदार कार्यालयावर धडक मोर्चा

वसई : गेल्या काही काळापासून वसईच्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर पडणारा दरोडा आणि प्रशासकीय यंत्रणेची त्याकडे असलेली डोळेझाक यांविरोधात आता जनक्षोभ उसळला आहे. वाळू,मातीची बेकायदेशीर लूट व विकासाच्या नावाखाली हिरवाईची होणारी कत्तल थांबविण्यासाठी वसईतील जागरूक नागरिकांनी आंदोलनाचे हत्यार उपसले असून येत्या शनिवारी, २५ एप्रिलला वसई तहसीलदार कार्यालयावर धडक मोर्चा काढला जाणार आहे.

वसई विरार पट्ट्यातील पर्यावरणाची विविध मार्गाने हानी होऊ लागली आहे. गेल्या काही वर्षात खाडी पात्रात व किनार पट्टीच्या भागात अमर्याद वाळू उपसा, बेकायदेशीर मार्गाने होणारे मातीचे उत्खनन, बेकायदेशीर मातीभराव, नैसर्गिक जलस्रोत नष्ट करण्याचे प्रकार व मोठ्या प्रमाणावर होत असलेली वृक्ष तोड यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. यासंदर्भात स्थानिक नागरिकांनी आणि पर्यावरणप्रेमींनी वेळोवेळी महसूल विभागाकडे तक्रारी केल्या होत्या.

# "जल हित में जारी" मोहिमेला ठाण्यात गती; जलसंवर्धनासाठी विशेष समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव : आ. ॲड. निरंजन डावखरे

ठाणे : पाणी बचत आणि जलसंवर्धनाबाबत व्यापक जनजागृती करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या "जल हित में जारी" या मोहिमेला ठाण्यात नवी दिशा मिळत असून, या उपक्रमांतर्गत महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या पुढाकारातून ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे. हिंदी चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री अमृता राव यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या मोहिमेत आदित्य चौहान यांचा सक्रिय सहभाग असून, ठाणे शहरात शाश्वत जलव्यवस्थापनासाठी ठोस उपाययोजना राबविण्यावर भर देण्यात येत आहे.



या मोहिमेअंतर्गत आज आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी अमृता राव यांच्यासह ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांची भेट घेऊन जलसंवर्धनासाठी विशेष समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला. तसेच बांधकाम व्यावसायिकांना या उपक्रमात सहभागी करून घेत, पाणी पुनर्वापर, रेनवॉटर हार्वेस्टिंग आणि शाश्वत जलव्यवस्थापन यांसाठी व्यापक नियोजन करण्यावर चर्चा झाली. मोहिमेची सविस्तर रूपरेषा यावेळी सादर करण्यात आली असून, आयुक्तांनी या उपक्रमाचे स्वागत करत लवकरच समिती गठित करण्याचे आश्वासन दिले.



या मोहिमेची अधिकृत घोषणा यापूर्वी CREDAI-MCHI प्रदर्शनात करण्यात आली होती. पाणी ही भविष्यासाठीची अमूल्य संपत्ती असल्याने प्रत्येक नागरिकाने पाणी बचतीची जबाबदारी स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात येत आहे.

यावेळी आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी नमूद केले की, "जलसंवर्धन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन ठाणे शहराला जलसाक्षर आणि जलसमृद्ध बनविण्याचा आमचा निर्धार आहे."

ही मोहीम ठाण्यात जनजागृतीपासून कृतीपर्यंतचा प्रवास घडवणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

पनवेल पालिका आणि महानगर गॅस लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमानातून

# पीएनजी गॅस पाईपलाईन कनेक्शनसाठी नोंदणी शिबिराचे आयोजन



पनवेल : केंद्र शासनाच्या नैसर्गिक गॅस पुरवठा वाढविण्यावर भर दिला आहे.केंद्र शासनाच्या सूचनेनूसार एलपीजीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दृष्टीने, ज्या भागात गॅस पाईपलाईन उपलब्ध आहे त्या भागातील नागरिकांनी पीएनजी गॅसचा अधिकाधिक वापरास जास्तीत जास्त प्रोत्साहन देण्यासाठी पनवेल महानगरपालिका आणि महानगर गॅस लिमिटेड (MGL) यांच्या संयुक्त विद्यमाने पीएनजी (पाईपद्वारे नैसर्गिक वायू) गॅस पाईपलाईन कनेक्शनसाठी विशेष नोंदणी शिबिराचे आयोजन रविवार, 26 एप्रिल रोजी लोकनेते दि.बा. पाटील शाळेमध्ये सकाळी 9 .00 ते रात्री 9.00 वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेऊन पीएनजी गॅस कनेक्शनसाठी नोंदणी करावी, असे आवाहन महापालिकेच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि सोयीस्कर इंधनाचा वापर वाढविण्याच्या उद्देशाने जास्तीत जास्त नागरिकांनी महानगर गॅसचे कनेक्शन घेणे गरजेचे आहे. महानगर गॅस लिमिटेडकडून अखंड पीएनजी व सीएनजी पुरवठ्याची हमी देण्यात आली असून नागरिकांना या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### शिबिराची माहिती

■ दिनांक : 26 एप्रिल 2026
■ वेळ : सकाळी 9.00 ते रात्री 9.00
■ ठिकाण : लोकनेते दि. बा. पाटील शाळा, पनवेल

### नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

■ रहिवासी पुरावा (कोणताही एक)
■ वीज बिल
■ इंडेक्स-2 ची प्रत
■ पासपोर्ट साईज फोटो
■ ओळखपत्र (आधार कार्ड / पॅन कार्ड / मतदार ओळखपत्र / वाहन परवाना)
■ ई-मेल आयडी
■ सक्रिय मोबाईल नंबर

# कर्करोगावर कच्चा आंबा असतो गुणकारी

भारतामध्ये आंबा हे फळ फार लोकप्रिय आहे. आंब्याला फळांचा राजा असे म्हटले जाते. या फळाची किंमत देखील अन्य फळांच्या तुलनेमध्ये जास्त असते. आपल्या देशात हापूससह आंब्याच्या अनेक प्रजाती पाहायला मिळतात. आंबा जेव्हा कच्चा असतो, तेव्हा त्याला कैरी असे म्हटले जाते. आपल्याकडे कैरी देखील आवडीने खाल्ली जाते. तिचा वापर जेवणामध्ये, लोणचं तयार करताना केला जातो. आंबट-गोड कैरी खाण्याचा अनेकांना मोह आवरत नाही. कच्च्या कैरीपासून बनवलेले सरबत उन्हाळ्यात आवडीने प्यायले जाते. कैरी आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर असते. उन्हाळ्यात कैरीचा समावेश आहारामध्ये असणे का आवश्यक असते याबद्दलची माहिती आम्ही देणार आहोत.



### साखरेचे प्रमाण नियत्रंणात राहते.

अन्य फळांच्या तुलनेमध्ये कैरीमध्ये साखरेचे प्रमाण कमी असते. यामुळे मधुमेहग्रस्त रुग्ण कैरीचे सहज सेवन करु शकतात. तिच्या सेवनामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहण्यास मदत होते.

### रोगप्रतिकारशक्ती वाढते.

शरीरातील रोगप्रतिकारशक्ती वाढावी यासाठी आवश्यक असलेले पोषक घटक कैरीमध्ये असतात. यात व्हिटामिन सी मुबलक प्रमाणात असते. एका अभ्यासानुसार, कैरीमध्ये व्हिटामिन ए देखील असते अशी माहिती समोर आली होती.

### हृदय निरोगी राहते.

कैरीमध्ये पोटॅशियम आणि मॅग्नेशियम असे महत्त्वपूर्ण घटक असतात. यांमुळे रक्ताभिसरणाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडते आणि हृदय निरोगी राहते. कैरीच्या सेवनामुळे रक्तदाबाशी संबंधित समस्या दूर होतात. यामध्ये मॅंगिफेरीनदेखील असते. हा अँटीऑक्सिडेंट घटक हृदय हेल्दी राहावे यासाठी मदत करत असतो. कैरीमुळे रक्तातील कोलेस्टेरॉल, ट्रायग्लिसराइड्स आणि फ्री फॅटी ॲसिडची पातळी नियंत्रणात राहते.

### कर्करोगाचा त्रास कमी होतो.

कैरीमध्ये पॉलिफेनॉल हा घटक आढळला जातो. या घटकामुळे कर्करोगावर मात करताना मदत होते. कच्च्या आंब्यामध्ये अँटी-कॅन्सर गुणधर्म असतात. यामुळे ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेसचे प्रमाण कमी होते. तज्ज्ञानुसार, पॉलिफेनॉल कर्करोगाच्या पेशी तयार होण्यामध्ये अडथळा निर्माण होतो.

■ गणेश चंद्रकांत भोईटे

वसई-विरार पालिकेच्या रुग्णालयांत 'रोटा व्हायरस' लसीचा खडखडाट

# लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

वसई : वसई विरार महापालिकेच्या विविध दवाखान्यांमध्ये गेल्या महिनाभरापासून 'रोटा व्हायरस' लसीचा तीव्र तुटवडा निर्माण झाला आहे. यामुळे लहान मुलांचे लसीकरण रखडले आहे. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय लसीकरण मोहिमेचा भाग असलेली ही महत्त्वाची लस उपलब्ध नसल्याने पालकांना रिकाम्या हाताने परतावे लागत असून लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

वसई विरार शहरात महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सेवा दिली जात आहे. या आरोग्य सेवेसाठी सद्यस्थितीत शहरात महापालिकेची ४ माताबाल संगोपन केंद्र, ७ रुग्णालये, २१ प्राथमिक आरोग्य केंद्र, १५ आपला दवाखाने, ३५ आयुष्यमान आरोग्य वर्धिनी केंद्र आहेत. त्याद्वारे नागरिकांना आरोग्य सेवा दिली जात आहे. मोठ्या संख्येने नागरिक या आरोग्य सेवेचा लाभ घेण्यासाठी येत असतात. विशेषतः लहान बाळांसाठी महापालिकेकडून विविध आजारावरील लसीकरण केले जाते. यात रोटा व्हायरस लसींचे लसीकरणाचा समावेश आहे.

मात्र मागील महिना भरापासून पाच वर्षा खालील मुलांना दिली जाणारी 'रोटा व्हायरस' लसींचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे आरोग्य केंद्रात लसीकरणासाठी येणाऱ्या पालकांना लस उपलब्ध नसल्याने रिकाम्या हाताने घरी परतावे लागत आहे. रोटा व्हायरसची लस बाळाला ठराविक वयात (६, १० आणि १४ आठवडे) देणे अनिवार्य असते. पहिली मात्रा ठराविक वेळेत न मिळाल्यास पुढील मात्रेच्या नियोजनावर परिणाम होतो. लस वेळेत न मिळाल्यास मुलांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती पालकांकडून व्यक्त होत आहे. रोटा व्हायरस लस उपलब्ध नसल्याबाबत भाजपचे नगरसेवक महेश सरवणकर यांनी या संदर्भात पालिका आयुक्तांना लेखी निवेदन दिले आहे. या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, लसीच्या अभावामुळे पालकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. पालिकेच्या आरोग्य विभागाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन सर्व नागरी आरोग्य केंद्रांमध्ये पुरेसा साठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

**काय आहे रोटा व्हायरस लस ?**

रोटा व्हायरस लस ही लहान मुलांमध्ये होणारा गंभीर अतिसार आणि उलट्या रोखण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. पाच वर्षांखालील मुलांमध्ये रोटा व्हायरस संसर्गामुळे होणारा जुलाब आणि निर्जलीकरण रोखणे हा या लसीचा मुख्य उद्देश आहे. ही लस बाळाला सहा आठवडे, दहा आठवडे आणि १४ आठवड्यांच्या (दीड, अडीच, साडेतीन महिने) अंतराने तीन डोसमध्ये तोंडावाटे दिली जाते. या लसीचा पहिला डोस सहा आठवड्यांच्या आत आणि अंतिम डोस आठ महिन्यांच्या आत देणे अनिवार्य असते. लस वेळेत न मिळाल्यास मुले या गंभीर आजाराच्या विळख्यात अडकण्याची शक्यता असते. भारत सरकारच्या राष्ट्रीय लसीकरण मोहिमेअंतर्गत ही लस सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे
■ ठाणे, बुधवार दि. २२ एप्रिल २०२६


महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांनी घेतला

# ठाणे शहरात सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामाचा आढावा

ठाणे (गणेश भोईटे) : मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे शहरातील विविध भागात युध्दपातळीवर सुरू असून आज महापौर शर्मिला पिंपळोलकर, आयुक्त सौरभ राव यांनी प्रत्यक्ष विविध ठिकाणी जावून नालेसफाईच्या कामाचा आढावा घेतला. या पाहणीदरम्यान नाल्यातील काढलेला गाळ हा तिथेच न ठेवता तो सुकल्यानंतर योग्य ठिकाणी त्याचे स्थलांतरण करणे, तसेच आवश्यक त्या ठिकाणी नाल्यांच्या संरक्षक भिंतींची दुरूस्ती करणे तसेच रोबोटिक यंत्राचा वापर करुन शहरातील नाले सफाईची कामे 31 मे पूर्वी पूर्ण होतील या दृष्टीने नियोजन करण्याचे आदेश महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी प्रशासनाला दिले.




“घोडबंदर रोड येथील बटाटा कंपनी येथील नाला, कापूरबावडी, कॅसलमिल तसेच वर्तकनगर येथील थिराणी शाळेजवळील नाल्यांची पाहणी करण्यात आली. या नालेसफाई पाहणी दौऱ्यास उपमहापौर कृष्णा पाटील, स्थानिक नगरसेविका विमल भोईर, नंदा पाटील, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, नगरअभियंता राणी शिंदे, उपायुक्त मधुकर बोडके, दिनेश तायडे, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, उपनगरअभियंता (पाणीपुरवठा) विकास ढोले, उपनगरअभियंता (विद्युत) शुभांगी केसवणी, सहायक आयुक्त सोनल काळे, गणेश चौधरी यांच्यासह कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

### कामगारांच्या सुरक्षितेतवर भर

ज्या ठिकाणी रोबोटिक यंत्राच्या सहाय्याने नालेसफाई करणे शक्य आहे त्या ठिकाणी रोबोटिक यंत्राच्या सहाय्याने नालेसफाईची कामे सुरू आहेत.परंतु ज्या ठिकाणी नाले अरुंद आहेत त्या ठिकाणी मनुष्यबळाचा वापर करुन नाल्याची कामे केली जात आहे.
कामगारांना गमबूट, हॅण्डग्लोज, मास्क यासह सुरक्षेची काळजी देखील घेण्यात आली असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले. तसेच संबंधित कंत्राटदारालाही कामगारांसाठी प्रथमोपचार साहित्य ठेवण्याबाबतही सूचना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी नमूद केले.

### उपमहापौरांनी केले महापौर, आयुक्तांचे अभिनंदन

यंदा नालेसफाई एप्रिल महिन्यातच सुरुवात केल्याबद्दल उपमहापौर कृष्णा पाटील यांनी महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांचे आभार व्यक्त केले. यंदा लवकर सुरू झालेल्या नालेसफाई कामामुळे पूरस्थिती टाळण्यास मदत होईल. तर स्थानिक नगरसेविका नंदा पाटील यांनी नालेसफाई वर्षातून दोनदा करण्याची मागणी केली. तसेच नागरिकांनी कचरा नाल्यात न टाकता घंटागाडीमध्ये टाकावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

*मुंब्रा परिसरातून नालेसफाईला सुरूवात करण्यात आली असून ठाणे शहरातही नालेसफाईच्या कामाने वेग घेतला आहे, त्यामुळे यंदा मे अखेरपर्यत सर्व नालेसफाईची कामे पूर्ण होतील असा विश्वास महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी यावेळी व्यक्त केला.*
*ठाणे शहरातील 186 किलोमीटर लांबीच्या नाल्यांची सफाई करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यावर्षी विविध प्रभागातील नालेसफाईसाठी सात ठेकेदारांची नियुक्ती करून कामाचा वेग वाढविण्यात आला आहे. नाल्यातून काढण्यात येणारा गाळ शास्त्रोक्त पद्धतीने हाताळण्यासाठी त्याचे योग्य ठिकाणी स्थलांतरण यावर विशेष भर दिला जात असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.*
*शहरातील विविध भागात सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामाचा दैनंदिन आढावा घेतला जात असून, ज्या कंत्राटदारांकडे मनुष्यबळ किंवा यंत्रसामग्रीची कमतरता भासेल त्यांना तातडीने मदत उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.*
*पाहणीद रम्यान काही ठिकाणी जुने कल्व्हर्ट, तसेच कॅसल मिल येथील नाल्यावरील पूल हा जीर्ण झाला असल्याचे निदर्शनास आले असून या पुलाचे व्हीजेटीआयमार्फत स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या असल्याचे आयुक्तांनी यावेळी सांगितले.*
*मान्सूनपूर्व कामाचे नियोजन करत असताना महापालिका, एमएमआरडीए, मेट्रो, एमएसआरडीसी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यात समन्वय ठेवण्यावरही भर देण्यात येत आहे. घोडबंदर रोड हा विविध प्राधिकरणाच्या अखत्यारित येत असून या ठिकाणी असलेली कामे मान्सूनपूर्वी करण्यासंदर्भात सर्व प्राधिकरणासोबत या मार्गाची संयुक्त पाहणी महापौरांसमवेत करण्यात येणार असल्याचेही आयुक्त सौरभ राव यांनी यावेळी नमूद केले.*

# स्मार्ट सिटी की ‘हॉट सिटी’? ठाण्यात उष्णतेचा कहर

■ ४० अंशांच्या उष्णतेत होरपळतंय ठाणे; काँक्रीटीकरणामुळे ‘हिट आयलंड’चा वाढता धोका

ठाणे (गणेश भोईटे) : ठाणे शहरातील तापमानाने सध्या ३८ ते ४० अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला असून, वाढत्या काँक्रीटीकरणामुळे ‘अर्बन हीट आयलंड’ प्रभाव तीव्र होत असल्याचे चित्र समोर येत आहे. एकेकाळी हिरवाईसाठी ओळखले जाणारे ठाणे आता सिमेंट-काँक्रीटच्या जाळ्यात अडकत असून, याचा थेट परिणाम पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

शहरी पर्यावरणशास्त्रानुसार, मोकळी जमीन, जलस्रोत आणि दाट वृक्षराजी हे घटक नैसर्गिक शीतलनासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. मात्र शहरात काँक्रीटची डांबरी रस्ते, वाढती बांधकामे आणि काचेच्या उंच इमारती यामुळे उष्णता शोषून ती दीर्घकाळ टिकवून ठेवण्याची प्रक्रिया वाढते. परिणामी दिवस-रात्र तापमानातील फरक कमी होऊन परिसर अधिक उष्ण राहतो. ठाण्यात मोकळ्या जागा आणि



हिरवळीचे प्रमाण झपाट्याने घटत असल्याने ‘इव्हॅपो-ट्रान्सपिरेशन’ ही नैसर्गिक प्रक्रिया कमी होत आहे. झाडांच्या माध्यमातून वातावरणातील उष्णता कमी करण्याची क्षमता घटल्याने शहरात उष्णतेचा साठा वाढत आहे. विशेषतः मोठ्या, छायादायी वृक्षांची तोड करून त्यांच्या जागी शोभेची किंवा जलद वाढणारी पण कमी पर्यावरणीय उपयुक्तता असलेली झाडे लावण्याचा वाढता कल परिस्थिती अधिक गंभीर करत आहे.

तज्ज्ञांच्या मते, काचेच्या इमारतींमुळे स्थानिक पातळीवर ‘ग्रीनहाऊस इफेक्ट’सदृश स्थिती निर्माण होते. सूर्यप्रकाश आत येतो, मात्र उष्णता पूर्णपणे बाहेर जात नाही, त्यामुळे परिसरातील तापमानात आणखी वाढ होते. याशिवाय वाहनांची वाढती संख्या, वातानुकूलन यंत्रांचा वापर आणि औद्योगिक क्रियाकलापही उष्णतेत भर घालत आहेत.

तापमानवाढीचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, उष्माघात, श्वसनविकार आणि हृदयविकाराच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि मैदानी काम करणारे नागरिक यांना याचा अधिक फटका बसत आहे.

पर्यावरण अभ्यासकांच्या मते, परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शहरात ‘ग्रीन कव्हर’ वाढवणे, देशी वृक्षप्रजातींचे संवर्धन, पावसाच्या पाण्याचे संकलन, मोकळ्या जमिनींचे संरक्षण आणि ‘कूल रूफ’ तंत्रज्ञानाचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे. तसेच शहरी नियोजनात पर्यावरणीय समतोलाला प्राधान्य देणे ही काळाची गरज बनली आहे.

निसर्गाचे वरदान लाभलेले ठाणे शहर सध्या विकास आणि पर्यावरण यांच्यातील संघर्षाच्या टप्प्यावर उभे आहे. योग्य वेळी शास्त्रीय आणि पर्यावरणपूरक उपाययोजना राबवल्यासच भविष्यातील उष्णतेचा व प्रदूषणाचा धोका टाळता येईल; अन्यथा ‘स्मार्ट सिटी’सोबतच ‘हॉट सिटी’ अशी ओळख निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

“शहरात सिमेंट-काँक्रीट वाढल्यामुळे जमीन उष्णता शोषून ठेवते आणि हवा थंड होण्याची प्रक्रिया कमी होते; त्यामुळेच ठाण्यात तापमान वाढत आहे - हिरवळ वाढवणं हाच यावर सोपा आणि परिणामकारक उपाय आहे.”
**- डॉ. प्रशांत सिनकर** (पर्यावरण अभ्यासक)

ठाणे पालिकेच्या आस्थापनेवर सरळसेवेच्या भरती प्रक्रियेमध्ये कोव्हिड कालावधीत काम करणाऱ्या

# कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार करावा : उपमहापौर कृष्णा पाटील यांची प्रस्तावाची सूचना

ठाणे : ठाणे महापालिकेच्या आस्थापनेवर सरळसेवेच्या भरती प्रक्रियेमध्ये कोव्हिड -१९ कालावधीत काम करणारे कर्मचारी व इतर विभागात ठोक पगारावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार करावा, अशी मागणीरुपी प्रस्तावाची सूचना उपमहापौर कृष्णा पाटील यांनी ठाणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मांडणार असून भाजपा गटनेते मुकेश मोकाशी यांनी त्याला अनुमोदन दिले आहे.
ठाणे महापालिकेमध्ये सध्या विविध संवर्गाची सरळसेवेने भरती करण्याची प्रक्रीया चालू असून, त्या अनुषंगाने प्रशासनाकडून कार्यवाही सुरु आहे. परंतू सदर सरळसेवा भरती करतांना, ठाणे महानगरपालिकेत कोव्हीड-१९ कालावधीत काम करणारे कर्मचारी व इतर विभागामध्ये ठोक पगारावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार करणे जरुरीचे आहे.
ठाणे महानगरपालिकेत कोव्हीड-१९ कालावधीत जाहिरातीन्वये विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांची भरती केली होती. तसेच काही विभागामध्ये अत्यावश्यक बाब म्हणून ठोक पगारावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती. परंतू सद्या



ठाणे महापालिकेत चालू असलेल्या या भरती प्रक्रियेमध्ये त्यांना प्राधान्यक्रम न दिल्यामुळे त्यांचेवर अन्याय करण्यासारखे होईल अशी भावना उपमहापौर कृष्णा पाटील यांनी व्यक्त केली आहे.
सन २०२२ मध्ये कोव्हीड-१९ च्या कालावधीत ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती, त्यांना महापालिकेच्या आस्थापनेवर घेण्यासाठी प्राधान्यक्रम देण्यात यावा अशा प्रकारची चर्चा होऊन, त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी प्रशासनास सूचना केल्याचे कृष्णा पाटील यांनी महापौरांना दिलेल्या पत्रात नमूद केले असून ठाणे महानगरपालिकेच्या सरळसेवा भरती प्रक्रीयेमध्ये कोव्हीड-१९ कालावधीत काम करणारे कर्मचारी वर्ग व इतर विभागात ठोक पगारावर काम करणारे कर्मचारी या सर्वांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन, त्यांचा प्राधान्याने विचार करण्याची मागणी उपमहापौर कृष्ण पाटील यांनी केली आहे. सदर प्रस्तावाची सूचना आगामी मा. सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर घेऊन, चर्चा करुन, त्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यसाठी संबंधितांना आदेश देण्याची विनंतीही कृष्णा पाटील यांनी केली आहे.



# ‘जुनी पेन्शन’सह विविध मागण्यांसाठी बेमुदत संप

■ सिव्हिल रुग्णालयीन कामकाजावर परिणाम ■ राज्य सरकारी कर्मचारी, तांत्रिक कर्मचारी व नर्सेस फेडरेशनची संयुक्त भूमिका ■ सेवा विस्कळीत

ठाणे : राज्य सरकारी कर्मचारी संघटना, गट ‘ड’ चतुर्थ श्रेणी कर्मचारी महासंघ, तांत्रिक कर्मचारी तसेच नर्सेस फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारपासून बेमुदत संपाची हाक देण्यात आली आहे. या संपाचा थेट परिणाम सिव्हिल रुग्णालयातील कामकाजावर झाल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

जुनी पेन्शन योजना लागू करावी, सरळसेवा भरती प्रक्रिया तातडीने राबवावी, १९८१ चा शासन निर्णय पुनर्जीवित करावा, कॅशलेस विमा योजना लागू करून संबंधितांना कार्ड देण्यात यावे, तसेच परिचारिकांना बदली प्रक्रियेतून वगळण्यात यावे अशा विविध महत्त्वाच्या मागण्यांसाठी हा संप पुकारण्यात आला आहे.
या आंदोलनात राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे (सिव्हिल रुग्णालय) अध्यक्ष अनिल घेगडमल, नर्सेस फेडरेशनच्या अध्यक्षा स्नेहा ठाकूर तसेच तांत्रिक विभागाचे मनोहर गरजे, शर्मिला पठारे आदींच्या नेतृत्वाखाली परिचारिका, तांत्रिक कर्मचारी आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.
संपामुळे सिव्हिल रुग्णालयातील नियमित सेवा विस्कळीत झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. रुग्णांना आवश्यक सेवा मिळण्यात विलंब होत असून, प्रशासनासमोर पर्यायी व्यवस्था उभारण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.
दरम्यान, कर्मचारी संघटनांनी आपल्या मागण्या तातडीने मान्य कराव्यात, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे.

# कै. उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान प्रकल्पाला वेग : आ. संजय केळकर

ठाणे: कळवा पुलाजवळील रखडलेल्या कै. उत्तमराव पाटील जैव विविधता उद्यान प्रकल्पाला गती मिळाली असून जिल्हा नियोजन, कांदळवन आणि आमदार निधीतून हा प्रकल्प मार्गी लागणार असल्याची माहिती आमदार संजय केळकर यांनी दिली.
भाजपच्या खोपट येथील कार्यालयात आयोजित जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमात आमदार संजय केळकर यांनी माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. यावेळी आमदार निरंजन डावखरे, शेखर पाटील, कैलास म्हात्रे, दया यादव, भाजपा महिला आघाडीच्या स्वप्नाली साळवी उपस्थित होते.
कळवा पूल ते साकेत या खाडीकिनारी अतिक्रमणे आणि डम्पिंग यामुळे परिसराला अवकळा आली होती. शहरात हरित क्षेत्र वाढवणे, स्थानिक जैवविविधता जपणे, नागरिकांना निसर्गाशी जोडणे आणि विद्यार्थ्यांना पर्यावरण शिक्षण मिळावे या उद्देशाने आमदार संजय केळकर यांनी येथे जैवविविधता उद्यान प्रकल्पाची संकल्पना मांडली होती. तत्कालीन जिल्हाधिकारी अश्विनी जोशी यांनी सामाजिक वनिकरणातून हा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आणि त्याचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र ठाकरे सरकारच्या कार्यकाळात या प्रकल्पाला स्थगिती देण्यात आली तसेच देखभालीसाठी देखील निधी न दिल्याने या प्रकल्पाला अवकळा आल्याचे केळकर यांनी सांगितले. सहा महिन्यांपासून याबाबत पुन्हा हालचाली सुरू करण्यात आल्या असून वनमंत्री, प्रधान सचिव यांच्यासह तीन बैठका घेण्यात आल्या. त्यानुसार हा प्रकल्प कांदळवन विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच जिल्हा नियोजन, कांदळवन आणि आमदार निधीतून या प्रकल्पाचे काम नव्याने सुरू करण्यात येणार असल्याचे केळकर म्हणाले.
खोपट येथील एसटी आगारात ज्येष्ठ नागरीकांना सवलतीचे पास देण्यात येत आहेत. येथे एकच खिडकी असून कर्मचारीही उपलब्ध नसतो. त्यामुळे भर उन्हात ज्येष्ठांना




ताटकळत उभे राहावे लागते. यामुळे शासनाच्या चांगल्या योजना अपयशी होतात, अशी भीती केळकर यांनी व्यक्त केली. येथे आणखी काही खिडक्या पुरेशा मनुष्यबळासह सुरू करण्यात याव्यात, जेणेकरून ज्येष्ठांना ताटकळत उभे राहण्याची पाळी येणार नाही, यासाठी केळकर यांनी मुख्य अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानुसार उद्यापासून सक्षम व्यवस्था सुरू करणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे केळकर म्हणाले.
जनसेवकाचा जनसंवाद या कार्यक्रमात सायबर फसवणूक, पुनर्विकास योजनेतील रहिवाशांची फसवणूक, मंत्रालय, महापालिका संदर्भातील तक्रारी, कमी दाबाने पाणी पुरवठा याबाबत निवेदने प्राप्त झाली. या कार्यक्रमात सोलापूर येथील नागरिकाने देखील वहिवाटीचा रस्ता अडकल्याची तक्रार केली. यावेळी केळकर यांनी संबंधित अधिकारी आणि तेथील स्थानिक आमदार यांच्याशी संपर्क साधून हा विषय मार्गी लावला.
डोंबिवलीजवळ असलेली पिंपळास या असंरक्षित किल्ल्यावर रायगडावर असल्यासारखी मेघडंबरी व छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती बसविण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे राष्ट्रीय अध्यक्ष केळकर यांनी दिली. सह्याद्री प्रतिष्ठानचे डोंबिवली विभागाचे गणेश मांगले, सुर्वे व कार्यकर्ते देखील यावेळी उपस्थित होते. यावेळी एका शिवभक्ताने आ. केळकर यांच्याकडे एक लाख अकराहजार रु. चा धनादेश पिंपळास गडावर बसविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्ती करिता अर्पण केला.

# डेअरी आणि चीज ॲनालॉगच्या वापराबाबत अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन

ठाणे :- अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 च्या ध्येयधोरणानुसार सर्वसामान्य जनतेला सकस आणि सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध करून देणे, हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. भारत हा दुग्ध उत्पादनात जगात अग्रेसर असून भारतीय आहारामध्ये पनीरला विशेष महत्त्व आहे. चविष्ट असण्यासोबतच पनीर हे प्रथिने, कॅल्शियम आणि आवश्यक खनिजांनी समृद्ध असल्याने शाकाहारी लोकांसाठी ते पोषणाचा एक उत्तम स्रोत मानले जाते. मात्र, अलीकडे बाजारपेठेत ‘पनीर’ आणि ‘चीज’ यांच्या नावाखाली ‘ ॲनालॉग’ पदार्थांचा वापर वाढत असल्याचे समोर आले आहे. मुळात पनीर हा केवळ दुधापासून बनवलेला पदार्थ असतो, तर दुसरीकडे ‘डेअरी ॲनालॉग’ हे दूध सोडून इतर खाद्यतेल, स्टार्च आणि इमल्सिफायर वापरून बनवले जाते, जे केवळ पनीरसारखे दिसते पण प्रत्यक्षात पनीर नसते.
अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे की, अनेक रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि फास्ट फूड विक्रेते अन्न तयार करताना मोठ्या प्रमाणात चीज ॲनालॉगचा वापर करतात, परंतु ग्राहकांना त्याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नाही. यामुळे ग्राहकांची फसवणूक आणि दिशाभूल होत असून अशा तक्रारी प्राप्त होत आहेत. कायद्यानुसार ग्राहकांना ते काय खातात हे जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. अन्न सुरक्षा मानके (लेबनलिंग आणि डिस्प्ले) विनियम 2020 नुसार, सर्व अन्न व्यवसायिकांनी विक्रीच्या ठिकाणी पदार्थांमधील घटक आणि पोषणमूल्यांची माहिती प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. तसेच उत्पादक आणि पुरवठादारांनी त्यांच्या विक्री बिलावर तो पदार्थ ‘डेअरी ॲनालॉग’ किंवा ‘चीज ॲनालॉग’ असल्याचे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.
हॉटेल आणि रेस्टॉरंट चालकांसाठी आता हे अनिवार्य करण्यात आले आहे की, जर त्यांनी ॲनालॉग पदार्थांचा वापर केला असेल, तर त्याचा स्पष्ट उल्लेख त्यांच्या मेनूकार्डवर किंवा इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डवर असणे आवश्यक आहे. ग्राहकांनी देखील जागरूक राहून पॅकबंद उत्पादने खरेदी करताना त्यावरील लेबल तपासावे आणि हॉटेलमध्ये ऑर्डर देताना पनीर व चीज ॲनालॉग स्वतंत्रपणे नमूद केले आहेत का, याची खात्री करावी. विशेष म्हणजे, ॲनालॉग पदार्थ आरोग्यास अपायकारक नसले तरी त्यांची पोषणमूल्ये पनीरपेक्षा पूर्णपणे वेगळी असतात, त्यामुळे ग्राहकांना योग्य माहिती असणे गरजेचे आहे.
अन्न सुरक्षा आयुक्त श्री.श्रीधर डुबे-पाटील यांनी असा इशारा दिला आहे की, कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही विक्रेत्यावर किंवा उत्पादकावर कठोर कारवाई केली जाईल. ज्या व्यावसायिकांनी परवाना घेताना स्वतःचा ईमेल किंवा मोबाईल क्रमांक दिलेला नाही, त्यांनी तो तातडीने अपडेट करावा. प्रशासनाकडून हॉटेल चालकांना यासंदर्भात आवश्यक सूचना त्यांच्या नोंदणीकृत क्रमांकावर पाठवण्यात आल्या आहेत. ग्राहकांनी अशा प्रकारची दिशाभूल झाल्यास किंवा फसवणूक होत असल्याचे आढळल्यास प्रशासनाच्या १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर आपली तक्रार नोंदवावी, असे आवाहनही अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# ₹5 लाखांपर्यंत मोफत उपचार; ठाण्यात 1.54 लाख रुग्णांना दिलासा

■ आयुष्मान भारत व महात्मा फुले योजनांचा प्रभाव ■ सिव्हिल रुग्णालय ठरतेय सर्वसामान्यांसाठी जीवनदायी आधार

ठाणे : एप्रिल 2024 ते मार्च 2026 या कालावधीत केंद्र सरकारची आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि राज्य सरकारची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या एकत्रित आरोग्य योजनांअंतर्गत ठाणे जिल्ह्यात तब्बल 1,54,874 रुग्णांवर मोफत उपचार करण्यात आले असून, जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे (सिव्हिल) येथेही 240 रुग्णांना उपचाराचा लाभ मिळाला आहे;

ठाणे जिल्ह्यात एकूण 40 शासकीय व 115 खाजगी अशा 155 अंगीकृत रुग्णालयांसह 32 प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि 126 शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे मिळून तब्बल 313 आरोग्य सुविधा या योजनांअंतर्गत कार्यरत आहेत. तरीदेखील, महागड्या खाजगी उपचारांच्या भीतीने किंवा माहितीअभावी अनेक नागरिक सरकारी यंत्रणेकडे पाठ फिरवत असल्याचे दिसून येते.
जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांना चांगले उपचार दिले जातात त्यामुळे सिव्हिल रुग्णालय हेच सर्वसामान्य, कामगार, गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सर्वात मोठा आधार ठरत आहे. येथे शासनाच्या योजनांमुळे अनेक गंभीर आजारांवर मोफत उपचार मिळत असल्याची माहिती वरीष्ठ जिल्हा समन्वयक डॉ. रविंद्र जगतकर यांनी दिली
आरोग्य हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क असताना, योजनांचा लाभ न घेणे हीच सर्वात मोठी हानी ठरत आहे. आयुष्मान कार्डच्या माध्यमातून लाखो रुपयांपर्यंतचे उपचार मोफत मिळू शकतात, मात्र त्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया मोबाईल ॲपद्वारे नोंदणी, आधार पडताळणी आणि e-KYC अनेकांना अजूनही माहिती नाही.

“शासनाच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत सर्वसामान्यांना दर्जेदार उपचार मोफत उपलब्ध आहेत. पात्र नागरिकांनी पुढाकार घेऊन आयुष्मान कार्ड काढावे आणि या योजनांचा पूर्ण लाभ घ्यावा.”
**-डॉ. कैलास पवार** (जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे)

“गेल्या काही दिवसांपासून मला Umbilical Herniaचा त्रास होत होता. मात्र आयुष्मान भारत योजना अंतर्गत सिव्हिल रुग्णालयात मला वेळेवर आणि दर्जेदार उपचार मिळाले. कोणताही आर्थिक भार न पडता उपचार झाल्याने मला मोठा दिलासा मिळाला.
**-सुनील पांडे** (नवी मुंबई)

‘महाराष्ट्र सम्राट’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१